# National Service Scheme

**SURYADATTA COLLEGE OF MANAGEMENT INFORMATION RESEARCH & TECHNOLOGY, PUNE-21**

**“Not me, But You”**

**PERSONAL DETAILS**

\- **National service scheme (NSS) 7 days residential Camp at Bhugaon, Tal Mulshi, Dist Pune.**

**08th January 2015 to 14th January 2015**

Under Corporate Social Responsibility, Suryadatta Group of Institutes proactively coordinating and executing social projects regularly for holistic development of the students. From the last two years Suryadatta College of Management Information Research & Technology (SCMIRT), Bavdhan, Pune organized NSS Winter Special Camp 7 days residential Camp in collaboration with National service scheme, under the Ministry of Youth Affairs & Sports Govt. of India ~~and~~ Savitribai Phule Pune University , jointly from 08 January 2015 to 14th January 2015, at Bhugoan, Tal Mulshi ,Dist Pune. Total 25 Suryadatta College volunteers participated in the residential camp. Under the guidance of Prof. Vandana Malhotra (Principal SCMIRT) and Prof. Jyoti Gaikwad NSS Program Officer.

PROGRAM INAUGURATION






रा.से.यो. च्या शिबिरात एकूण ५ मुली व २० मुले सहभागी होते. शिबिरात प्राध्यापक उल्हास चौधरी - कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. ह्या ७ दिवसाच्या मुक्कामी शिबिरात स्वयंसेवक आणि गावकऱ्यांच्या सहयोगाने विविध कार्यक्रम राबविण्यात आलीत, त्याचा आढावा पुढीलप्रमाणे.

निर्मल भारत अभियान




ह्या उपक्रमात ग्रामपंचायत मधील सदस्य, सरपंच मा. श्री विजय सानपुते, उप सरपंच मा. सौ. मनिषा शेळके ताई व ग्रामस्थ मंडळी यांचे समवेत निर्मल भारत व हगणमुक्ती (प्रत्येक घरात शौचालय) ह्या विषयावर मंथन, सर्वे आणि जनजागृती करण्यात आली.

शिक्षण हक्क कायदा जन जागृति



गावातील गावकऱ्यांमध्ये शिक्षणाचे महत्व, मुलींना शिक्षण प्राधान्य, प्रत्येक मुलास शिक्षण ह्या सर्व विषयावर विचार मंथन, ग्रामपंचायत सदस्य यांचे मार्गदर्शन, गावातील विविध अधिकारी, शिक्षकगण यांचे वक्तव्य सादर करण्यात आले.

गो गोठ्याचे पाहनी व्यवस्थापन SURVEY – ABOUT VILLAGES



गावातील गुरव वस्तीवर जाऊन गो गोठ्याचे पाहणीकरण आणि गो गोठ्याचे व्यवस्थापन करण्यात आले. गो-गोठ्यांमध्ये पाण्याचे नियोजन, केरकचरा व्यवस्थापन केले.

गावातील इतर भागातील गुरांची संख्या व व्यवस्थापन आढावा घेतला.

मंदिर परिसर, शाला, स्वच्छता गृह स्वच्छता









शिबिरा दरम्यान सर्व स्वयंसेवकांनी मिळुन पुर्व माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा, मुलींची शाळा मैदान स्वच्छता, बगीचा व्यवस्थापन, झुला परिसर मांडणी, शाळेतील झाडांनी विटांनी आळ तयार करणे. मैदान समतोल करणे, केरकचरा व्यवस्थापन, झाडांची सुरक्षा इ. काम पार पाडले.

शाळेतील स्वच्छता गृहाची निट सफाई, सर्व स्वच्छता गृह केमीकल, स्पिरिट घालून साफ करणे.

मंदिर परिसर स्वच्छता- मंदिराचा गाभारा, छत, गॅलरी, स्वच्छता गृह, आंगण या सर्व परिसरांची स्वच्छता या शिबीरा दरम्यान वेग-वेगळ्या दिवशी नियोजन करुन करण्यात आली.

शाष्वत व सर्वांगीण ग्रामविकास आराखडा (VILAGE SURVE)





स्वयंसेवकांना दोन-दोन च्या गटात विभाजून गावातील विविध भागात घरात जाऊन सर्वांगिण ग्रामविकास आराखडा फॉर्म भरून घेतला.

यात गावातील सुखसुविधा, वीज, रस्ता, पाणी, स्वच्छता गृह, सांडपाणी - कचरा व्यवस्थापन, वैयक्तीक माहिती, जनगनना, शिक्षण माहिती अशा विविध विषयांची माहिती जमा करण्यात आली.

सर्व आराखडे फॉर्म जमा करून सर्वेक्षणाच्या एक सर्व साधारण आराखडा तयार करण्यात आला.

1. पानी जीरवा पानी वाचवा रॅली ( WASTE WATER MANAGEMENT AWARENESS)





ह्या उपक्रमाअंतर्गत "पाणी जीरवा पाणी वाचवा" ह्या विषयावर गावात रॅली काढण्यात आली. ग्रामस्थ मंडळींचाही उत्तम सहभाग ह्या रॅलीस मिळाला.

गावातील प्रत्येक घरासमोर जाऊन जनजागृती करण्यात आली. नळ गळती आणि विनातोटी नळांची यादी तयार करून लोकांना पाणी वापरावर माहिती स्वयंसेवकांनी दिली. सांडपाण्याचा पुनरवापर कसा करावा यावर माहिती देण्यात आली.

वरील विषयावर पोष्टर स्पर्धा घेण्यात आली आणि सर्व पोष्टर गावात ठिकठिकाणी लावण्यात आली.

पानी जीरवा पानी वाचवा (POSTER COMPETITION)



- वैयक्तिक स्वछता - शालेय मुलाना हात स्वछता विषयी माहिती आणि प्रात्यक्षित





झि.प. शाळेतील पुर्व प्रायमिक, प्रायमिक आणि खाजगी ज्युनिअर कॉलेज येथील मुला-मुलींना हात स्वच्छता, वैयक्तीक स्वच्छता यावर मार्गदर्शन करून प्रात्याक्षिक करून दाखवले. स्वयंसेवकांनी असेम्बली मैदानावर आणि प्रत्येक वर्गात जावून मुलांकडून हात धुण्याचे प्रयोग करून घेतले. या उपक्रमात स्वयंसेवकांनी एक सुखद अनुभव अनुभवला.

- लेक लाडकी अभियान / महिला सबलीकारण




महिला सबलीकरणात मा. उप स. शेळके ताईच्या सहयोगाने ग्रामस्त महिला, बचत गट महिला, शाळेतील मुली यांच्या सहभागाने पार पडला.

प्रमुख वक्त्या सौ. वर्षा मुरे SCMIRT प्राचार्य, विशेष




आतिथी सौ. कविता म्हसके आणि सौ. चित्रा बोरावले, भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, पुणे यांची उपस्थितीत भ्रुण अत्याचार / हत्या, मुलींचे शिक्षण, नारी सबलीकरण, लेक वाचवा, महिला स्वतंत्र यासारख्या बऱ्याच विषयांवर मंथन झाले. महिलांनी शिकून स्वबलंबी बनुन गृहउद्योग उभारावे यावर प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केला.

आरोग्य तपासणी शिबिर - मधुमेह आणि रक्तदाब तपासणी



या मधुमेह आणि रक्तदाब तपासणी शिबीराचे शुभारंभ सरपंचांच्या तपासणीने करून तपासणीचा लाभ गावकऱ्यांनी घेतला. २०-२० च्या ग्रुपमध्ये लोकांना बसवून डॉक्टरांनी लोकांना मधुमेह विकाराचा सल्लाही दिला.

वृक्ष रोपण आणि सुरक्षा



भुगावाच्या छोट्या टेकड्यांवर पायथ्याशी वृक्षारोपण व इतर साबुत झाडांना पाणी मिळावे म्हणून खड्डे खोदून आळे करण्यात आले. स्वयंसेवकांच्या उत्साहाने तलावाशेजारी व डोंगर माथ्यावरही हा उपक्रम राबवीण्यात आला.

शेवटच्या दिवशी ग्रामपंचायत सदस्य, बचत गट आणि ग्रामस्थांनी समारोप दिला.

शिबिर समारोप